सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जिल्हाआपत्तीव्यवस्थापनप्राधिकरण, जिल्हाधिकारीकार्यालय, गोंदिया (नैसर्गीकआपत्तीशाखा)
दुरध्वनीक्र. 07182-236147, टोलफ्रीक्र. 1077 - फॅक्स क्र. - 07182-236145
E-mail - rdcgon@gmail.com, collector.gondia@maharashtra.gov.in

क्र.आ.व्य./कोरोना/विषाणू/780 /2021
दिनांक - 1 /06 /2021

**वाचा** - 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 चे कलम 30,33,34,41 व कलम 51
2. साथरोग अधिनियम 1897
3. महाराष्ट्र शासन क्रमांक कोरोना 2020/प्रा.क्र.58/आरोग्य-5, दिनांक 14 मार्च 2020
4. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीआयएसएम-1, दि.30.05.2021
5. या कार्यालयाचे आदेश क्र.आ.व्य./कोरोना/विषाणू/774/2021, दिनांक 31.05.2021

---

## // सुधारीत आदेश //

शासनाच्या मते कोव्हीड-19 विषाणूचा धोका अद्यापही टळलेला नसून सदर विषाणूचा प्रसार वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता उपरोक्त संदर्भीय क्र. 04 अन्वये (**BREAK THE CHAIN**) कोव्हीड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून दिनांक 01.06.2021 च्या सकाळी 07.00 वाजेपर्यंतच्या लॉकडाऊनच्या कालावधीत वाढ करण्यात आलेली असून इतर उपरोक्त संदर्भीय आदेशांमध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेसह सदरचा लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 01.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपासून ते दिनांक 15.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत करण्याबाबतचे आदेश उपरोक्त संदर्भीय क्र. 05 अन्वये करण्यात आलेले होते.

उपरोक्त संदर्भीय क्र. 05 आदेशामधील मुद्दा क्र. A मधील (b) च्या अनुषंगाने अत्यावश्यक नसलेल्या वस्तु व सेवांची दुकाने (फक्त स्वतंत्र / एकल दुकाने. मॉल्समधील अथवा शॉपींग सेंटर नाही) **सकाळी 07.00 ते सकाळी** 11.00 या वेळेत दिलेल्या अटी व शर्तीनुसार सुरू असतील व सदरची दुकाने शनिवार व रविवार बंद राहतील असे नमुद होते.

सबब सदरच्या आदेशात अंशत: बदल करण्यात येत असून **अत्यावश्यक नसलेल्या वस्तु व सेवांची दुकाने (फक्त स्वतंत्र / एकल दुकाने. मॉल्समधील अथवा शॉपींग सेंटर नाही) सकाळी 07.00 ते दुपारी 02.00 या वेळेत संदर्भीय क्र. 05 मध्ये दिलेल्या अटी व शर्तीनुसार सुरू असतील व सदरची दुकाने शनिवार व रविवार बंद राहतील. तसेच उपरोक्त संदर्भीय क्र. 05 मधील इतर अटी व शर्ती निर्गमीत केलेल्या आदेशाप्रमाणेच लागु राहतील.**

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 01.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपासून ते दिनांक 15.06.2021 चे सकाळी 07.00 वाजेपर्यंत लागू राहील.

सदर आदेशाचे पालन न करणारी/उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, संस्था अथवा समूह यांनी साथरोग प्रतिबंधक कायदा 1897, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 तसेच भारतीय दंड संहिता 1860 नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे मानण्यात येईल व नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज **दिनांक 01.06.2021 रोजी** माझ्या सही व शिक्क्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

1/06/21

**( दीपक कुमार मीना )**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया.**

जिल्हाधिकारी यांचे कार्यालय, गोंदिया.

**प्रतिलीपी - सबब माहितीस्तव सविनय सादर / उचित कार्यवाहीस अग्रेषित.**

1) मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई-32
2) मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग,नागपूर
3) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया
4) पोलीस अधिक्षक, गोंदिया
5) अपर जिल्हाधिकारी, गोंदिया
6) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी -------------------(सर्व)
7) पोलीस उपविभागीय अधिकारी ---------------(सर्व)
8) तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी (सर्व) ................................
9) जिल्हा माहिती अधिकारी, गोंदिया
10) जिल्हा प्रशासन अधिकारी, नगर पंचायत गोंदिया
11) मुख्याधिकारी, नगरपरिषद/पंचायती सर्व
12) सर्व विभाग प्रमुख/कार्यालयप्रमुख
13) ........................................................................................................................

**( दीपक कुमार मीना )**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया.**